## अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक १.४.२०००

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८

क्र.इएलडी२०००/सीआर१०२३२ (१)/ऊर्जा१.- मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८ (१९५८चा मुंबई अधिनियम क्र.४०) याच्या अनुसूचीतील भाग अ,ब,क,फ आणि ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिका-यांचा वापर करुन आणि शासन अधिसूचना,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र.इएलडी१०९६/सीआर २८६४/ऊर्जा२, दि.१.१०.९६ चे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याव्दारे एप्रिल २००० या बिलींग महिन्यापासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात भाग अ,ब,क,फ आणि ग याखाली होणा-या वीज वापरासाठी खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे विद्युत शुल्काचे दर विनिर्दिष्ट करीत आहे.:

अनुसूची

| | |
|---|---|
| अ) भाग-अ | वापर आकाराच्या १० टक्के |
| ब) भाग-ब | वापर आकाराच्या ११ टक्के |
| क) भाग-क | वापर आकाराच्या ७ टक्के. |
| ड) भाग-फ | वापर आकाराच्या ५ टक्के |
| इ) भाग-ग | ३० पैसे प्रति युनिट |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.बा.पाटील
उप सचिव(ऊर्जा)

प्रति
व्यवस्थापक,शासकीय मुद्रणालय,चर्नी रोड,मुंबई.

यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र भाग-४ ब मध्ये प्रसिध्द करुन १०० प्रती या विभागास पाठविण्याची कृपया व्यवस्था करावी.

(कै.द.भंडलकर)
कक्ष अधिकारी.